**नियमित दिवाणी दावा क्र.५१/२००८**
**विक्रम वि. गोविंद**

–:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::–

वादी, प्रतिवादी आणि त्यांचे अधिवक्ता यांचा वारंवार पुकारा केला असता ते गैरहजर आहेत. मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. प्रतिवादीचा अर्ज नि.२६१ वरील आदेशाप्रमाणे सा.क्र.५ विनायक यांना फेरतपासाकरिता बोलावण्याची परवानगी दिली आणि दोन्ही पक्षांनी प्रकरण तत्परतेने चालविण्याबाबत निर्देश दिले होते. परंतु आजरोजी साक्षीदार क्र.५ विनायक गैरहजर आहे. प्रतिवादींनी साक्षीदाराला हजर ठेवून त्याचा फेरतपास घेणे बंधनकारक होते. त्यांनी त्यांच्यावरील बंधनाचा भंग केला. त्याचप्रमाणे अर्ज नि.२६१ मध्ये साक्षीदाराला साक्ष समन्स काढून फेरतपास घेण्यासाठी बोलवावे अशी विनंती करण्यात आलेली नव्हती. तसेच साक्षीदारास साक्षी समन्स काढण्यासाठी अर्ज दाखल नाही. याउलट दि.२५/०३/२०२६ रोजी प्रतिवादींचे अधिवक्ता श्री. बी.व्ही. पाटील यांनी साक्षीदारांना हजर ठेवून साक्ष पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु त्याची पूर्तता झालेली नाही. प्रतिवादींनी त्याकरिता कसूर केलेला आहे. यथास्थितीत, प्रतिवादींच्या कसुरामुळे वीस वर्षापेक्षा जुने प्रकरण विनाकारण व विनाप्रगती प्रलंबित आहे. सबब प्रतिवादींच्या कसुरामुळे साक्षीदार क्र.५ चा फेरतपास बंद करण्यात येते आणि प्रकरण पुढे चालविण्यात येते.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.03.30 17:40:33 +0530

**ठिकाण – देवणी** **( श.अ. सुरजुसे )**
**दिनांक – ३०–०३–२०२६** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**